22 AUG 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बेरी यांचे जीवन चरित्र प्रकाशित व्हावे

## कुलगुरू दिगंबर शिर्के यांची अपेक्षा : जन्मशताब्दी वर्षातील कार्यक्रमाचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आर्किटेक्ट, इंजिनिअर आर. एस. बेरी यांनी कोल्हापूर शहराच्या आर्किटेक्ट क्षेत्राचा पाया रचला. त्यांनी मानवी मूल्ये जपली. त्यांचे जीवन, कार्य नव्या पिढीला मार्गदर्शक ठरणारे आहे. त्यामुळे बेरी यांच्या जीवनातील विविध पैलूंचे दर्शन घडविणारे चरित्र प्रकाशित व्हावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी शनिवारी येथे केले.

आर. एस. बेरी (नाना) यांच्या जन्मशताब्दी वर्ष कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवनातील या कार्यक्रमास अमेरिकन आर्किटेक्ट क्रिस्तोफर बेनिनझर प्रमुख उपस्थित होते. बेरी यांनी आर्किटेक्ट क्षेत्रात नवनिर्मितीसह आपल्या कार्यशैलीचा वेगळा ठसा उमटविला. त्यांनी केलेल्या कार्याचा आणि त्यातील वैशिष्ट्यांचा अभ्यास व्हावा.



कोल्हापुरात शनिवारी आर्किटेक्ट आर. एस. बेरी यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी कुलगुरू डी. टी. शिर्के आणि ख्यातनाम वास्तुविशारद ख्रिस्तोफर बेनिनझर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन केले. यावेळी डावीकडून विजय कोराणे, चंदन मिरजकर, सुभाष कुकारणी, महेश साळुंखे, शिरीष बेरी, अजय कोराणे, प्रदीप कुलकर्णी, प्रमोद बेरी उपस्थित होते.

त्यांचे चरित्र प्रकाशन कार्यात विद्यापीठाकडून सहकार्य केले जाईल, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले.

आर्किटेक्ट, इंजिनिअर म्हणून कार्यरत राहण्यासह या क्षेत्रातील विविध घटकांना त्यांनी प्रत्यक्ष आणि पुस्तकांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. त्यांनी दिशा देण्याचे काम केले. त्यांचे कार्य सर्वांना प्रेरणादायी ठरणारे असल्याचे बेनिनझर यांनी सांगितले. आर्किटेक्ट प्रमोद बेरी आणि शिरीष बेरी यांनी प्रमुख उपस्थितांचे स्वागत केले. जन्मशताब्दीनिमित्त घेण्यात आलेल्या स्केचिंग, शॉर्ट फिल्म मेकिंग, इंटेरिअर डिझाइन स्पर्धेतील विजेत्यांना विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागातील प्रा. महेश साळुंखे यांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले. असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट अँड इंजिनिअर्सचे अध्यक्ष अजय कोराणे यांनी जन्मशताब्दीतील विविध कार्यक्रम, उपक्रमांची माहिती दिली. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स कोल्हापूर लोकल सेंटरचे सचिव प्रदीप कुलकर्णी यांनी स्वागत केले. डेक्कन इन्स्टिट्यूटचे शैक्षणिक सल्लागार प्रमोद चौगुले यांनी आभार मानले.

### आठवणींना उजाळा

या कार्यक्रमात डेक्कन इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी, विनिता आरगे, शिरीष आणि प्रमोद बेरी, आर. के. जोशी, आनंद पाटील, प्रकाश देवलापूरकर, रवींद्र ओबेरॉय, के. एस. कापसे, आदींनी नाना यांच्याबाबतच्या आठवणींना उजाळा दिला.

पुण्यनगरी

# विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीची संधी

**कोल्हापूर :** नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार विद्यार्थ्यांना एकाच वेळी अनेक कौशल्य संपादन करण्यासाठी तयार केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थ्यांना एकाच वेळी पदविका आणि दोन पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेता येणार आहे. हा नियम शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी अभ्यासक्रमासाठी लागू आहे.

विद्यार्थ्यांना दोन पूर्ण वेळ पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण एकाच वेळी घेण्याची परवानगी नव्हती. पूर्ण वेळ पदवीचे शिक्षण घेताना पदविका किंवा अर्धवेळ पदवीचे शिक्षण घेता येत होते; मात्र आता एकाचवेळी दोन पूर्ण वेळ अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येईल. त्यामुळे एकाचवेळी दोन पदविका-पदवी, पदव्युत्तर पदवी किंवा एक पदवी आणि पदव्युत्तर पदवी, पदविका आणि पदवी असे वेगवेगळे पर्याय उपलब्ध होणार आहेत. पदव्युत्तर शिक्षण घेत असताना विद्यार्थ्याला दुसऱ्या विषयाच्या पदवी अभ्यासक्रमाचीही निवड करता येईल. विद्यापीठ अनुदान आयोगानुसार विषय निवडण्याची कोणतीही सक्ती विद्यार्थ्यावर असणार नाही. हा निर्णय डिप्लोमा, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी लागू आहे; मात्र पीएचडी आणि एम.फिल. पदवीसाठी लागू होणार नाही.